म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. 9240



# कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401250

# सद्गुणी बनण्याची कला

# सद्गुणी बनण्याची कला

कांहीं तरी नवीन करा : २१

मूळ लेखक : बेंजामिन फ्रँकलिन
अनुवादक : ना. ग. देशपांडे

★

पन्नास नये पैसे

★

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

BVBK-0401250



...वाचनालय शाखा.
१२५० दि० २०।५।६९
वा.वा.

श्री : १७६

©: १९५९
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

::

प्रकाशक
अ. ल. गाडगीळ,
वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता,
मुंबई २.

::

आवृत्ति पहिली
१९५९
आवृत्ति दुसरी
१९६३

::

मूल्य ५० नये पैसे

::

मुद्रक :
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी,
मुंबई ५९.

# बेंजामिन फ्रँकलिनचें आत्मचरित्र

अमेरिकन राष्ट्रनिर्मितीच्या कामीं ज्या थोर विभूतींनीं हातभार लावला त्यांत जॉर्ज वॉशिंग्टन-बरोबर बेंजामिन फ्रँकलिन याचें नांव प्रसिद्ध आहे. तो शास्त्रज्ञ होता. विद्युत्शास्त्रांतील त्याचे शोध प्रसिद्ध आहेत. संगीतशास्त्रांत हार्मोनिका हें नवीन स्वतंत्र वाद्य त्यानेंच निर्माण केलें. आपल्या राष्ट्राचा प्रतिनिधि म्हणून त्यानें आदर्श काम केलें आहे. गुलामी नष्ट व्हावी यासाठींहि त्यानें प्रयत्न केले आहेत. अमेरिकन राज्यघटना बनविण्यांत त्यानें प्रामुख्यानें भाग घेतला होता. परन्तु या सर्वांपेक्षा आजहि जर त्यांची ख्याति कशाबद्दल असेल तर ती म्हणजे त्यांचें आश्चर्य-कारक चातुर्य व सूक्ष्म व्यवहारज्ञान याबद्दल होय त्यानें राजकीय, सामाजिक, आर्थिक, शास्त्रीय असें अनेक प्रकारचें लेखन केलें आहे. पण त्या सर्व ठिकाणीं त्याचे हे दोन गुण अगदीं उठावानें दिसून येतात. यांतील त्याच्या एका पुस्तकाची योग्यता स्थलकालातीत आहे. तें म्हणजे त्यानें लिहिलेलें 'आत्मचरित्र.'

आपल्या मुलाला मार्गदर्शन करण्यासाठीं एका पित्यानें वात्सल्यानें आपल्या जीवनांतल्या मार्गदर्शक हकीकती सांगितल्या आहेत, तें हें आत्मचरित्र. आणि त्यांतून महत्त्वाचा भाग येथें निवडला आहे.

—अनुवादक

# सद्‌गुणी बनण्याची कला

थोड्याच दिवसांत पेन्सिल्व्हानिया येथें माझा चांगलाच जम बसला. त्या काळीं त्या भागांत म्हणजे बोस्टन पासूनच्या दक्षिणेस सर्व वसाहतींत एकहि चांगलें नांव घेण्याजोगें मोठें पुस्तकाचें दुकान नव्हतें. न्यूयॉर्क व फिलाडेल्फिया येथें कांहीं छापखानेवालेच हा धंदा करीत असत. परंतु त्यांच्या विक्रीच्या वस्तु कोणत्या असत ? तर कुठें कागद, कुठे वर्तमानपत्रें, कधीं लावण्या-पोवाडे, अगदीं शिकस्त शिकस्त म्हणजे सामान्य शाळकरी पुस्तकें ! त्यामुळें ज्यांना वाचनाची आवड होती, त्यांना आपलीं पुस्तकें थेट इंग्लंडहून मागविण्याखेरीज मार्गच नव्हता.

आमच्या जुंटो संस्थेंतील प्रत्येकाजवळ कांहीं पुस्तकें होतीं आणि ज्या जुन्या धर्मशाळेंत पूर्वी आम्ही जमत असूं, ती याच सुमारास सोडून देऊन एक नवीन खोली आम्हीं नुकतीच भाड्यानें घेतली होती; आणि तेथें आम्हीं जमत होतों. त्यावेळच्या आमच्या एका बैठकींत मीं सहज सुचविलें कीं आपण सर्वांनीं आपलीं सर्व पुस्तकें तेथें एकत्र करावींत म्हणजे तीं आपल्या मंडळींच्या सामुदायिक चर्चेच्या प्रसंगीं संदर्भासाठीं उपयोगी पडतील. आणि त्यांचा फायदा सर्वांनाच मिळेल. इतकेंच नव्हे तर कोणीहि आपणांस हवें असलेलें त्यांतील एखादें पुस्तक वाचण्यासाठीं खुशाल घरीं

घेऊन जावें. माझी ही योजना सर्वांना पसंत पडून त्याप्रमाणें सर्वांचा ग्रंथसंग्रह एकत्रित करण्यांत आला व यावर कांहीं दिवसपर्यंत आमचें काम चाललें.

### सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयाचा प्रारंभ

या छोटया ग्रंथसंग्रहालयाचा फायदा थोडयाच दिवसांत दिसून आला. मग माझ्या मनांत पुस्तकें सार्वजनिक मालकीचीं करतां यावींत व त्याचा फायदा जास्तींत जास्त लोकांना देतां यावा असें आलें. हें कसें करतां येईल यासंबंधीं विचार करतां मला सार्वजनिक ग्रंथालयाची कल्पना सुचली. लगेच मी तिचा स्थूल आराखडा तयार केला. कांहीं तात्पुरते जुजबी नियम तयार करणें प्राप्त होतें; तेहि तयार केले. पण या सर्वांना व्यवस्थित घटनात्मक स्वरूप देणें आवश्यक होतें. त्यावेळीं सुदैवानें श्री. चार्लस् ब्रॉकडेन या कुशल वकिलांचें साह्य मी मिळवूं शकलों व त्या सर्व गोष्टी आम्ही व्यवस्थित घटनात्मक स्वरूपांत मांडल्या. प्रतिज्ञापत्रक तयार झालें. त्या प्रतिज्ञापत्रकानुसार प्रथमारंभीं पुस्तकें विकत घेण्यासाठीं कांहीं विशिष्ट रक्कम व नंतर ग्रंथसंग्रह वाढविण्यासाठीं प्रतिवार्षिक कांहीं विशिष्ट वर्गणी द्यावी लागत असे.

फिलाडेल्फियामध्यें वाचनाची हौस असलेल्या लोकांची संख्या त्यावेळीं अगदींच कमी होती. आणि ज्यांना हौस होती त्यांतीलहि बहुसंख्य लोक इतके गरीब आणि दरिद्री होते कीं मीं बरीच धडपड केल्यानंतरहि या आमच्या

ग्रंथालयासाठीं जेमतेम पन्नास एक वर्गणीदार मला मिळाले. त्यांपैकीं बहुतेकजण तरुण व्यापारी होते. त्यांनीं प्रथमची देणगी म्हणून चाळीस शिलिंग व प्रतिवार्षिक वर्गणी दहा शिलिंग देण्याचें कबूल केलें. एवढ्याशा या छोट्या गंगाजळीनेंच आम्ही वाचनालयाच्या कामास सुरवात केली. इंग्लंडहून पुस्तकें मागविलीं. हें वाचनालय आठवड्यांतून एक दिवस उघडें राही. त्यावेळीं सभासदांना पुस्तकें दिलीं जात. पुस्तक देतांना प्रत्येकाकडून लिहून घेतलें जाई कीं 'जर पुस्तक व्यवस्थित परत आणलें नाहीं तर पुस्तकाची दुप्पट किंमत मी देईन.' या संस्थेची उपयुक्तता वाढतां वाढतां लवकरच सर्वांच्या ध्यानांत आली व तिच्या अनुकरणानें इतर भागांत व दुसऱ्या शहरांत अशीं सार्वजनिक ग्रंथालयें खूपच निघालीं. मग पुढें पुढें या ग्रंथालयांना देणग्याहि मिळूं लागल्या व वाचन ही गोष्टहि एक फॅशन होऊन बसली. वाचनाखेरीज करमणुकीचीं सार्वजनिक साधनें दुसरीं कोणतींच उपलब्ध नसल्याकारणानें आमच्या जनतेचा उत्तमोत्तम ग्रंथांशीं चांगलाच परिचय झाला. आणि थोड्याच दिवसांत असें आढळून आलें, कीं इतर देशांतील नागरिकापेक्षां त्याच दर्जाचे अमेरिकन लोक हे बौद्धिकदृष्ट्या अधिक प्रगत व बहुश्रुत आहेत. अगदीं तिऱ्हाइतांनींसुद्धां असेंच मत व्यक्त केलें आहे.

वरील ग्रंथालयाची स्थापना करण्यासाठीं आम्ही जमलों होतों व आम्हां स्वत:वर आणि आमच्या वारसावर पन्नास वर्षेंपर्यंत बंधनकारक असलेल्या प्रतिज्ञापत्रकावर सह्या करणार होतों. इतक्यांत आमचे कायदा-सल्लागार श्री.

ब्रॉकडेन म्हणाले—"तुम्ही तरुण आहांत ही गोष्ट खरी आहे; पण पन्नास वर्षांपर्यंत तुम्हांपैकीं कितीजण जगतील ? मला तर ही गोष्ट बहुतांशीं अशक्यच वाटते." पण सुदैवानें आम्हांपैकीं बरेच जण अजूनहि हयात आहेत. पुढें कांहीं वर्षांनंतर तें प्रतिज्ञापत्रक व तो घटना हीं सर्वच निरुपयोगी ठरलीं; कारण मग सरकारनें कायदा करून या ग्रंथालयाला सनद दिली व त्याला चिरंजीवित्व प्राप्त झालें.

या ग्रंथालयासाठीं वर्गणीदार सभासद मिळवीत असतांना मला अनेकांच्या अनेक प्रकारच्या आक्षेपांना तोंड द्यावें लागलें; तसेंच अनेकांच्या उपेक्षावृत्तीचाहि अनुभव आला. त्यावरून एक गोष्ट मात्र मला कळून चुकली. ती ही कीं तुम्हीं सार्वजनिक हिताची एखादी कितीहि चांगली कल्पना काढलीत तरी जर त्यांत दुसऱ्या मंडळींचें साह्य लागत असेल—आणि बहुतांशीं तसें लागतेंच—तर ती कल्पना तुमची स्वतःची आहे असें तुम्ही बिलकुल भासवितां कामा नये. कारण त्यामुळें दुसऱ्यास असें भय वाटतें कीं, तुमची कीर्ति व लोकप्रियता जर आपल्यापेक्षां वाढली तर—? त्या वेळे-पासून मी स्वतःला शक्यतों लोकांच्या डोळ्यांवर येऊं देत नसे. आणि नेहमीं असें सांगें कीं कांहीं सभ्य गृहस्थांनीं—मित्रमंडळींनीं ही योजना आखली आहे. ज्यांना वाचनाची हौस आहे किंवा नाद आहे असें त्यांना वाटलें अशा आपणासारख्या कांहीं मंडळींना भेटून ही योजना मीं समजावून सांगावी, असें त्यांनीं मला सांगितलें आहे.

या मार्गानें मात्र माझें काम खूपच सुकर झालें. पुढेंहि आसल्या अन्य प्रसंगीं मीं हीच पद्धति चालूं ठेवली; आणि

तींत मला इतकें यश आलें आहे कीं सार्वजनिक काम करूं इच्छिणाऱ्या सर्वांनाच त्या पद्धतीची शिफारस केल्यावांचून मला राहवत नाहीं. असें करतांना सुरवातीस तुमच्या प्रतिष्ठेमध्यें कांहीं थोडा कमीपणा येतो खरा; पण या त्यागाची भरपाई भविष्यकाळांत अनेक पटींनीं मिळते यांत शंका नाहीं. या कल्पनेचें व यशाचें जनकत्व कोणाकडे जातें हें यामुळें कांहीं काळ तरी सर्वांनाच अज्ञात राहतें आणि त्यामुळें तुमच्यापेक्षां क्षुद्र असा एखादा मनुष्य तें श्रेय आपलें आहे असा दावा सांगूं लागतो. तरीसुद्धां कांहीं काळानंतर मग अगदीं हेवा आणि मत्सर यांचा प्रत्यक्ष अर्क असलेलें हें जगच तुम्हांला न्याय देईल. आणि त्या हलक्या लोकांचें खरें स्वरूप उघडें करून मानाचा शिरपेंच तुमच्या मस्तकीं बळें बळें खोवल्यांवाचून राहणार नाहीं.

## दीर्घोद्योग आणि काटकसर

लहानपणीं मला बौद्धिक शिक्षण देण्याची माझ्या वडिलांची फार इच्छा होती; पण तें जमूं शकलें नाहीं. आतां गांवांत ग्रंथालय झाल्यावर मात्र मी त्या दिशेनें प्रगति करण्याचा निश्चय केला व ग्रंथालय हें त्यासाठीं मला अगदीं योग्य साधन मिळालें. या माझ्या नित्य अभ्यासासाठीं दिवसाकांठीं दोन तास मीं अगदीं नित्य राखून ठेवलेले असत. या सततच्या अभ्यासामुळें माझ्यांत सुधारणा करण्यास मला भरपूर वाव मिळाला, व माझें पूर्वीं झालेलें नुकसान बऱ्याच अंशीं भरून निघालें, असें म्हणावयास हरकत नाहीं. त्या काळांत माझी करमणूक सुद्धां एकच आणि ती म्हणजे वाचन. त्यावेळीं मद्यपान,

खेळणें, गप्पाष्टकें झोडणें वगैरे क्षुद्र गोष्टींत मी जीवनाचा एक क्षणहि वाया जाऊं देत नसे. मला छापखान्यामुळें झालेलें थोडेंसें कर्ज फेडावयाचें होतें. त्यांतच एका वाढत्या कुटुंबाची जबाबदारी मजवर होती. मुलांच्या शिक्षणाची सोय करणें तर अगदीं जरूर होतें. आणि शिवाय माझ्याहि आधीं या व्यवसायांत शिरून चांगले सुप्रतिष्ठित झालेले दोन छापखानेवाले या गांवांत होते; त्यांच्याशीं मला टक्कर द्यावयाची होती. अविश्रांत परिश्रमाची नितांत आवश्यकता होती. अशा या परिस्थितींत माझा बराचसा वेळ हा त्या छापखान्याच्या कामांतच जात असल्यास नवल नव्हतें. पण हळूहळू दिवसानुदिवस माझी परिस्थिति सुधारत गेली. काटकसरीची संवय तर मला लहानपणा-पासूनच होती. कारण माझे वडील सॉलोमनचें एक वचन वरचेवर उच्चारीत असत व तें मी बालपणापासून ध्यानांत ठेवलें होतें. सॉलोमन म्हणतो—"जर एखादा मनुष्य आपल्या व्यवसायांत सतत परिश्रम करीत राहिला तर तो अगदीं राजदरबारीं जाऊन पोंचेल व हलक्या लोकांत त्यास राहावें लागणार नाहीं." त्यामुळें दीर्घ व सतत परिश्रम हेंच संपत्ति व प्रतिष्ठा मिळविण्याचें एकमेव साधन होय असा माझा पक्का निश्चय झाला होता. अर्थात् 'राजदरबारीं जाणें' हें मीं वाच्यार्थानें कधींच सत्य मानलें नाहीं. पण तेंहि प्रत्यक्षतः पुढें घडलें. पांच राजांच्या दरबारांत मी सन्मानानें उपस्थित राहिलों व एकाच्या—डेन्मार्कच्या महाराजांच्या—तर पंक्तीला भोजन करण्याचा मानहि मला मिळाला होता.

इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे. ज्याला भरभराटीची व प्रगतीची इच्छा आहे त्यानें नेहमीं आपल्या सहधर्मचारिणीचा सल्ला घेतला पाहिजे. सुदैवानें माझी पत्नीहि मजसारखीच काटकसरी व परिश्रम करणारी होती. माझ्या व्यवसायांत ती मला आनंदानें सर्व प्रकारचें सहकार्य करीत असे. माझ्या छापलेल्या कागदांच्या घड्या घालणें, ते शिवणें व टाचणें, कधीं दुकानांत गल्ल्यावर बसणें, कागद तयार करणाऱ्या लोकांसाठीं रेशमी कपडे व चिंध्या जमवणें असे बहुविध प्रकारचे उद्योग ती करत असे. आमच्याकडे एकहि आळशी नोकर आम्हीं कधीं कामावर ठेवला नाहीं. आमचें फर्निचर अगदीं हलकें होतें. आमचें खाणें सुद्धां अगदीं साधें असे. उदाहरण म्हणून फक्त एक सांगतों की, बरेच दिवसपर्यंत न्याहरीच्या वेळीं मी फक्त एक पाव व थोडेंसें दूध घेत असें. मी चहा घेत नसें. आणि हें खाद्य सुद्धां चारसहा पैशाला मिळणाऱ्या एखाद्या मातीच्या पारोळ्यांतून मी घेत असें. चमचासुद्धां मला साधा कथलाचा चाले. पण चैनबाजी व उधळपट्टी कशी आपल्या घरांत शिरते पहा ! एक दिवशीं न्याहरी तयार असल्याची आंतून वर्दी येतांच मी आंत गेलों व तेथील थाटमाट पाहून स्तंभितच झालों. न्याहरीच्या मेजावर सुंदरपैकीं चिनी मातीची थाळी व चांदीचा चमचा ! मी विचारांत पडलों की काटकसरीनें राहण्याचें ठरवून हें असें कसें झालें ? मला पत्ताहि न लागूं देतां आमच्या सौभाग्यवतींनीं हें सामान विकत घेतलें होतें. बरें, स्वस्त तरी होतें म्हणाल ? छेः चांगले तेवीस शिलिंग पडले

होते तेवढ्याला. आणि इतके पैसे खर्च करून ते विकत घेण्याचें कारण काय ? तर बाकीच्या सर्व शेजारणीचे नवरे अशा थाळ्यांतून व चांदीच्या चमच्यांनीं जेवत; तर मग हिच्याच नवऱ्याला तेवढें तसें कां नसावें ? बस्स! एवढें हें एकच कारण आमच्या बाईसाहेबांना पुरेंसें होतें. चिनी भांड्यांचा आमच्या घरांतील पहिला प्रवेश हा असा झाला. पुढें मग आमची परिस्थिति सुधारली आणि शेकडों पौंड किंमतीचीं तसलीं भांडीं आम्ही हळूहळू आमच्या संसारांत आणलीं, हा पुढचा भाग निराळा !

**धार्मिक शिक्षणाचा उद्देश**

धार्मिक शिक्षणाच्या दृष्टीनें म्हणाल तर मी लहानपणापासून प्रेस्‌बिटेरिटन पंथांत वाढलों होतों. परंतु त्या पंथाचीं कांहीं तत्त्वें मला अनाकलनीय वाटत आणि दुसरीं तत्त्वें संशयास्पद वाटत. आणि म्हणून आमच्या पंथाच्या चर्चमध्यें होणाऱ्या रविवारच्या धार्मिक सभांना मी उपस्थितच राहत नसें. शिवाय रविवार हा आमचा अभ्यासाचा दिवस ! यावरून धर्मासंबंधीं कांहींच श्रद्धा माझ्या मनांत नव्हती व नास्तिक म्हणूनच मीं जन्म घालविला असें मात्र नव्हे हं ! परमेश्वराच्या अस्तित्वावरची माझी श्रद्धा कधींच ढळली नाहीं. तसेंच, त्यानेंच हें सर्व जग निर्माण केलें. तोच आपल्या इच्छेने हें चालवीत आहे. सेवेनें त्याला संतुष्ट करण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे मनुष्यमात्राशीं सद्‌भावानें वागणें हाच होय. आपणां सर्वांचे आत्मे चिरंजीव आहेत. सर्व पापांचें

प्रायश्चित भोवावें लागणारच व सर्व पुण्याचें फलहि आपणांस मिळणारच मिळणार, मग तें येथें मिळो वा मृत्यूनंतर अन्यत्र कुठे मिळो–वगैरेसारख्या विचारांवरची माझी श्रद्धा सतत कायम होती.

माझ्या मतें प्रत्येक धर्माचा हा गाभा आहे. आणि आपल्या देशांतील प्रचलित सर्व धर्मपंथांत हीं तत्त्वें सांपडतात. बाकीचीं मतें म्हणजे आम्हां मानवांत तंटे पाडून आम्हांला एकमेकांशीं शत्रुत्व करावयास लावणारीं आहेत असें वाटून त्यांजबद्दल मला त्या मानानें अनादर वाटे. बरें, या अन्य तत्त्वांमुळें कांहीं नैतिक स्फुरण यावें, नीतिधैर्य, वाढावें. निदान चालू नीतीवरची श्रद्धा अधिक बळकट व्हावी; तसेंहि कांहीं घडत नसे. त्यामुळें त्यांच्याबद्दल माझ्या मनांत जरा कमी आदर असावा हें अगदीं स्वाभाविकच होतें. परंतु मला असेंहि वाटे कीं अगदीं वाइटांतलें वाईट मत जरी घेतलें तरी त्यालाहि कांहीं चांगल्या बाजूया असणारच. आणि त्यामुळें कोणाबद्दल कमी किंवा कोणाबद्दल जास्ती पण मला थोडाबहुत आदर सर्वच तत्त्वांबद्दल वाटत असे. त्याचा परिणाम असा झाला कीं दुसऱ्याच्या धर्मभावना दुखावतील किंवा त्याला त्याबद्दल कमीपणा वाटेल अशा तऱ्हेचें सर्व बोलणें मी टाळूं लागलों. इतकेंच नव्हे तर जसजशी आमच्या प्रान्ताची वस्ती वाढावयास लागली तसतशी निरनिराळ्या चर्चेस्‌ची वाण भासूं लागली. त्यावेळीं अशीं चर्चेस्–मग तीं कोणत्याहि पंथाचीं असेनात–स्थापन होऊं लागलीं. सामान्यतः हीं सर्व चर्चेस् लोकाश्रयावर चालत असत. आणि त्या सर्वांना मीं

शक्य असेल तेवढी सर्व मदत देण्याची टाळाटाळ करत नसें किंवा त्यांच्यांत दुजाभावहि ठेवीत नसें.

धार्मिक समारंभांना माझी उपस्थिति जरी क्वचितच असावयाची तरीसुद्धां जर ते समारंभ योग्य प्रकारें चालवले जात असतील तर समाजांत त्यांची आवश्यकता आहे व ते उपयुक्त ठरूं शकतील याविषयीं मात्र मला कधींच शंका आली नाहीं. आणि म्हणून आमच्या भागांत असलेल्या एकुलत्या एक प्रेस्बिटेरियन चर्चला खर्चासाठीं मी नियमितपणें कांहीं वर्गणी देत असें. त्या चर्चमधील आमचा उपाध्याय ( धर्मोपदेशक ) किंवा पाद्री मित्रत्वाच्या नात्यानें अनेक वेळां मजकडे येई आणि रविवारच्या त्याच्या उपदेशपर सभांना नित्य उपस्थित राहण्याबद्दल आग्रहानें सूचना करी. आणि कांहीं वेळां तरी मग मला तसें करावें लागे. एकदां तर सलग पांच रविवारीं मी त्याच्या प्रवचनांना हजर राहिलों. तो चांगला प्रवचनकार आहे असें जर मला वाटलें असतें तर कदाचित् आणखीहि कांहीं प्रवचनांना मी उपस्थित राहिलों असतों. आणि रविवारची सुटी जी मी अभ्यासांत घालवीत असें तो अभ्यास बुडल्याचेंहि मग मला तितकें कांहीं वाटलें नसतें. परंतु एक तर त्याचीं सर्व विधानें विवाद्य असत. आणि शिवाय आमच्या पंथाचीं कांहीं प्रमुख तत्त्वें अर्धवट स्पष्ट करण्यापलीकडे तो कांहीं अधिक करीत नसे. आणि शिवाय दुसरें म्हणजे हेंहि सर्व नीरस, कंटाळवाणें आणि ठरीव ठशाचें असे. त्याच्या प्रवचनांतून एकहि नीतितत्त्व आमच्या अन्तःकरणांत ठसलें नाहीं. मला तर असें वाटे कीं या सर्वांचा उद्देश आम्हांस

सुसंस्कृत नागरिक बनविण्याचा नसून आम्ही प्रेस्बिटेरियन पंथास चिकटून कसे राहूं असें उपदेशिण्याचा आहे.

अखेरीस एकदां असें झालें कीं एका रविवारीं त्या आचार्यांनीं प्रवचनासाठीं बायबलमधील एक वाक्य निवडलें होतें. तें वाक्य असें—" बंधुजनहो, शेवटीं इतकेंच सांगतों, कीं जें कांहीं सत्य, जें कांहीं सन्मान्य, जें कांहीं न्याय्य, जें कांहीं शुद्ध, जें कांहीं प्रिय, जें कांहीं सुश्राव्य, जो कांहीं सद्‌गुण, जी कांहीं स्तुति त्यांचें मनन करा. " आणि मला असें वाटलें कीं निदान या वाक्यावरच्या प्रवचनांत तरी नीतिधर्माविषयीचें प्रवचन असल्यावांचून राहावयाचें नाहीं. परंतु प्रत्यक्ष पाहतों तों काय ? या वाक्याचा अर्थ विशद करतांना तो मनुष्य केवळ पुढील चार पांच मुद्यांना चिकटून राहिला. (१) रविवार हा शब्बाथदिन असल्यानें त्या दिवशीं शुद्ध आचरण करावें; (२) बायबलचें पारायण न कंटाळतां नेहमीं करावें; (३) धार्मिक सभांना न चुकतां उपस्थित राहावें; (४) नैमित्तिक धार्मिक गोष्टींत भाग घ्यावा; आणि (५) धर्मगुरु व आचार्य यांचा अवश्य मान राखावा. आतां मला हें मान्य कीं कदाचित् या सर्वहि गोष्टी चांगल्या असतील. पण त्या मूळच्या आधारभूत वाक्यांतून या गोष्टी सुचविल्या जातात असें मला वाटलें नाहीं.

आणि त्यामुळें मला शेवटीं त्याच्या या असल्या सभांची उबग आली आणि मग मी त्याच्या एकाहि प्रवचनास गेलों नाहीं. त्या आधीं कांहीं वर्षांपूर्वीं म्हणजे १७२८ मध्यें मी माझ्या वैयक्तिक उपयोगासाठीं एक प्रार्थनापत्रक तयार केलें होतें. श्रद्धेय व धर्म-गोष्टी असें

नांव मी त्यास दिलें होतें. तेंच मी पुन्हां वापरूं लागलों. तेव्हांपासून अशा सार्वजनिक प्रार्थनासभेंत मी कधींहि उपस्थित राहिलों नाहीं. कदाचित माझें हें वागणें चुकीचें व दोषार्हहि असेल, परंतु त्यासंबंधीं कांहीं समर्थन वा स्पष्टीकरण न करतां मी तो मुद्दा येथेंच सोडतों. कारण जें कांहीं प्रत्यक्ष घडलें त्याचें कथन करणें एवढेंच माझें आतांचें काम आहे; त्यावेळच्या चुका निस्तरणें किंवा सावरणें हें नव्हे.

### गुणसंपन्न बनण्याचा निश्चय

साधारणपणें याच सुमारास मीं स्वतःला नैतिकदृष्टचा गुणसंपन्न बनविण्याचा निश्चय केला. अगदीं दुर्गुण म्हणून राहूं द्यावयाचा नाहीं असें मीं ठरविलें. हें कार्य अतिशय कठिण, दुःसाध्य व मनाची कसोटी पारखणारें होतें. मी ठरवीत होतों कीं केव्हांहि माझे हातून एखादा अपराध व दोष घडूं नये. तसेंच नैसर्गिक वासना, सामाजिक रुढि किंवा इष्टमित्रांचो संगत यामुळें मीं कधींहि मोहाचे आधीन होऊं नये. चांगलें काय व वाईट काय हें आपणास कळतें-निदान माझी तरी आपणांस हें कळतें अशी कल्पना होती–तर मग माणसानें, म्हणजे मी स्वतः नेहमींच चांगलें कां वागूं नये व वाईट नेहमींच कां टाळूं नये ? म्हणून मी त्या दिशेनें प्रयत्नास लागलों. परन्तु लवकरच माझ्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं मी समजत होतों तितकें कांहीं हें काम सोपें नाहीं. उलट तें खूपच अवघड आहे. एखादी गोष्ट आपल्या हातून चुकूं नये

म्हणून मी स्वतःच्या मनावर अगदीं डोळयांत तेल घालून पहारा देत असें तोंच हातून दुसरीच चूक घडून जावी. कांहीं वेळां चुकून माझेंच दुर्लक्ष होई आणि मग मला पूर्वींच जडलेल्या एखाद्या सवयीप्रमाणें चूक घडून जावी. कांहीं वेळां असें घडे कीं जरी बुद्धि बरोबर कोणतें व चूक कोणतें हें सांगे तरी पण मनःप्रवृत्ति तिचें ऐकावयास तयार नसे. यामुळें शेवटीं मी अशा निर्णयापर्यंत आलों कीं आपण चांगलें बनलेंच पाहिजे. नीतिमान् व सद्‌गुणी बनणें हें आपल्याच हिताचें आहे, वगैरेसारख्या केवळ बौद्धिक निश्चयानें कांहीं काम भागत नाहीं व तेवढयानें कांहीं आपल्या चुका कमी होणार नाहींत. म्हणून त्यासाठीं आपल्या अंगांत मुरलेल्या अयोग्य संवयी सोडल्या पाहिजेत. व नवीन योग्य संवयी अंगीं बाणवून घेतल्या पाहिजेत. तरच आपली वागणूक नैतिक दृष्टया स्थिर व विश्वासपात्र अशी बनूं शकेल. एरव्ही ही गोष्ट अशक्य आहे. यासाठीं मी पुढील पद्धति अमलांत आणण्याचें ठरविलें.

कोणते कोणते नैतिक सद्‌गुण मनुष्याच्या अंगी असावयास पाहिजेत याची मी एक यादी तयार करण्याचा प्रयत्न केला. माझ्या वाचनांत आलेल्या अनेक पुस्तकांत अशा गुणांच्या याद्या तयार करण्यांत आल्या होत्या. पण त्यामध्यें नैतिक सद्‌गुणांची संख्या मात्र कुठे सात,तर कुठे दहा, तर कुठे कुठे वीस अशी कमी जास्ती होती. कारण वेगवेगळया लेखकांनीं एकेका गुणाच्या सदराखाली कमी अधिक कल्पना घातल्या होत्या. उदाहरणार्थ सांगायचें झालें तर मर्यादशीलता या गुणाचें घ्या. कांहीं लोकांनीं

खाण्यापिण्यांतील संयम एवढाच याचा अर्थ केला होता तर दुसऱ्या लोकांनीं प्रत्येक सुखावर, अवडीनिवडीवर, मनःप्रवृत्तीवर, शारीरिक वा मानसिक वासना-भावनांवर, इतकेंच काय पण संपत्तीची इच्छा व महत्त्वाकांक्षा यांवरहि संयम ठेवणें याहि गोष्टी मर्यादशीलता याच गुणांत समाविष्ट केल्या होत्या. त्यामुळें त्यांच्या गुणांची संख्या कमी-जास्त झाली होती. आपला गोंधळ होऊं नये म्हणून मी असा विचार केला कीं एकवेळ गुणांची संख्या थोडी जास्त झाली तरी चालेल; परंतु एकाच नांवाखालीं अनेक कल्पनांची खिचडी नको. आणि म्हणून मीं माझ्यासाठीं जी गुणांची यादी केली त्यांत तेरा गुण घातले होते.

**तेरा गुण व व्याख्या**

हे तेरा गुण आपल्या अंगीं बाणणें आवश्यक व हिताचें आहे असें मला वाटलें. त्या तेरा गुणांच्या मी माझ्या कल्पनेप्रमाणें छोटचा छोटचा व्याख्याहि बनवल्या. त्या व्याख्या त्या त्या शब्दांचा अर्थ पुरेसा दाखवूं शकतील असें मला वाटतें. त्या त्या गुणांचीं नांवें व त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणें

१. मिताहार–सुस्ती येईल इतकें खाऊं नये; शुद्धि जाईल इतकी दारू पिऊं नये.

२ मौन– तुमच्या स्वतःच्या किंवा दुसऱ्या कोणाच्या हितासाठीं बोलणें आवश्यकच असेल तरच बोला. एरवी बोलूं नका. सर्व बिनमहत्त्वाचें बोलणें टाळा.

३. शिस्त— म्हणजे व्यवस्था. तुमच्या सर्व वस्तु आपापल्या जागेवरच असूं द्यात. तसेंच तुमच्या प्रत्येक छोटचा मोठ्या कामासाठीं राखीव वेळ असूं दे.

४. दृढनिश्चय— जें कर्तव्य असेल तें करण्याचा निश्चय करा. जें निश्चयानें ठरविलें असेल तें न चुकतां पार पाडा.

५. काटकसर— स्वतः तुम्ही किंवा दुसरे यांच्या फायद्यासाठींच केवळ खर्च करणें आवश्यक असेल तर खर्च करा. थोडक्यांत म्हणजे एक पैसुद्धां फुकट गमवूं नका.

६. दीर्घोद्योग— अजिबात एवढासा सुद्धां वेळ फुकट घालवूं नका. कांहींतरी उपयुक्त गोष्टीमध्यें सदा गुंतलेले असा. अनावश्यक अशा सर्व कृति टाळा.

७. सच्चेपणा— फसवाफसवी करून दुसऱ्या कोणासहि दुखवूं नका. निरागसपणें व न्याय्य विचार करा, व बोलणेंच असेल तर त्या विचारास अनुसरून बोला.

८. न्याय्यता— एखाद्याला शारीरिक वा मानसिक इजा करूं नका. तसेंच दुसऱ्याला जे लाभ तुमच्यापासून मिळावयाचे असतील ते बुडवूं नका.

९. संयम– अति सर्वत्र वर्जयेत्. दुसऱ्याची जशी योग्यता असेल त्या मानानेंच त्याच्यावर रागावून त्याला दुखविण्याचें टाळा. क्रोध आवरा.

१०. स्वच्छता– शरीर, कपडे व वसतिस्थान या बाबतींत कोणत्याहि प्रकारची अस्वच्छता सहन करूं नका.

११. शांति– क्षुद्र गोष्टींनीं मनाचा तोल व स्थिरता ढळूं देऊं नका. नेहमीं घडणारे अनपेक्षित प्रसंग किंवा माणसाला जे टाळतां येत नाहींत असे प्रसंग आले असतां मनाची शांति बिघडूं देऊं नका.

१२. पवित्रता– ब्रह्मचर्यपालन.

१३. नम्रता– येशू ख्रिस्त आणि सॉक्रेटिस यांचें अनुकरण करा.

हें सर्व करण्यांत ते गुण आपल्या अंगीं चांगले मुरून त्यांची सवय बनून जावी असा माझा हेतु होता. म्हणून मी मनाशीं असा विचार केला कीं हे सगळे गुण एकदमच आपल्या अंगीं आणूं असें म्हटल्यानें काम होणार नाहीं. कारण त्यामुळें आपलें लक्ष अशा विविध गुणांवर लागेल आणि मग तें विकेंद्रित होईल, एकाग्र राहणार नाहीं. म्हणून त्यांपैकीं एकेकावर आपली दृष्टि केंद्रित करावी व तो गुण आत्मसात् झालासा वाटल्यानंतर मग दुसरा घ्यावा. अशा क्रमानें हे सर्व तेराहि गुण आपल्या अंगीं मुरवावे. म्हणून मी त्या सर्व गुणांचा एक अनुक्रम लावला.

(तो वर दिलाच आहे). हे गुण अशाच क्रमानें लावण्याचें कारण हें कीं माझ्या मतें पहिला गुण अंगीं बाणल्यानें दुसरा गुण अंगांत मुरण्यास जरा सोपें जावें. उदाहरणार्थ पहा. मी मिताहाराला पहिला क्रमांक दिला; कारण त्यामुळें मेंदूला थंडावा व शांतता येईल आणि विचारशक्ति पल्लवित होईल. आणि ज्या ठिकाणीं सतत सावधानतेची आवश्यकता आहे, जुळचा, खोल रुजलेल्या संवयी मोडावयाच्या आहेत व नैसर्गिक मोहापासून मन आवरावयाचें आहे. अशा सर्व ठिकाणीं या शांत विचारशक्तीची किती आवश्यकता आहे. हें अगदीं स्पष्ट आहे. हा गुण आत्मसात् झाल्यावर मी दुसरा क्रमांक मौन याचा लावला. कारण माझी अशी इच्छा होती कीं मी सद्‌गुणी बनत असतांनाच मला सतत ज्ञानप्राप्तिहि व्हावी आणि संभाषणाद्वारें ज्यावेळीं ज्ञानप्राप्तीची शक्यता असते त्यावेळीं हें काम एका जिभेपेक्षां दोन कानांकडून जास्त चांगलें होतें. त्यासाठीं उगीच बडबड करणें, शाब्दिक कोटचा करणें, उथळ विनोद करणें वगैरे संवयी मला सोडून द्यावयास हव्या होत्या. त्यांचा आणखीहि एक तोटा होत असे. तो म्हणजे त्या संवयीमुळें माझ्या भोंवतीं अगदींच हलके लोक जमत. म्हणून मीं मौन या गुणाला दुसरा क्रमांक दिला. त्यानंतर पुढला अनुक्रम मी व्यवस्था किंवा शिस्त या गुणाला दिला. कारण मला असें वाटलें कीं आत्मनिरीक्षणास तसेंच माझ्या अभ्यासास त्यामुळें जास्त वेळ मिळेल. त्यानंतर दृढनिश्चय. या गुणाची जर एकदां संवय लागली तर त्यामुळें मी सतत धडपड करून उरलेले

गुणसुद्धां नक्की अंगांत बाणवून घेईन. काटकसर आणि सततोद्योग यामुळें मला माझें कर्जनिवारण करतां येऊन संपत्ति मिळेल व कोणाच्याहि मदतीविना स्वतंत्रपणें स्वाभिमानानें जगतां येईल. आणि मग त्यामुळें सच्चेपणा, न्याय्यता, वगैरे इतर गुण अंगीं आणणें मला अतिशय सोपें जाईल. अशा हेतूनें मी हा क्रम लावला होता. आतां पायथेगोरसनें सांगितल्याप्रमाणें कोणता गुण किती प्रमाणांत आपल्या अंगांत बाणला हें समजण्यासाठीं आपली आपण दैनंदिन परीक्षा घेतली पाहिजे; आणि त्यासाठीं पुढील पद्धति मीं शोधली व तिचा वापर करावयाचा असें मीं ठरविलें.

**आत्मनिरीक्षणाचा प्रयोग**

मीं एक लहानशी वही तयार केली व त्यांत प्रत्येक गुणाला एक एक पान दिलें. त्या पानावर तांबड्या शाईनें रेघा आंखल्या व आठवड्यांतील सात दिवसांसाठीं सात उभे स्तंभ आंखले. त्या स्तंभांच्या शिरोभागीं मीं त्या एकेका दिवसाचें आद्याक्षर लिहिलें. या स्तंभांना काटकोन करतील अशा आडव्या तेरा रेघा मीं आंखल्या व त्या प्रत्येक रेघेच्या सुरवातीस क्रमानें मीं त्या गुणांचीं आद्याक्षरें लिहिलीं. त्या त्या दिवशीं त्या त्या रेघेवर मी एक ठिपका किंवा खूण करीत असें आणि माझा प्रत्येक दोष तेथें याप्रकारें नोंदवीत असें. यामुळें कोणत्या दिवशीं कोणकोणत्या गुणांचे बाबतींत आपणांकडून हयगय झाली तें मला चटकन् दिसून येई.

या प्रत्येक गुणास मी क्रमानें एक एक आठवडा देत

असें. त्या आठवडयांत त्या त्या गुणाच्या बाबतींत मी अतिशय काळजीपूर्वक जपत असें. उदाहरणार्थ अगदीं पहिल्या आठवडयांत मी माझें लक्ष मिताहार या गुणावर केंद्रित करीत असें. त्या आठवडयांत या गुणाचे बाबतींत माझ्या हातून यत्किंचितहि, अगदीं छोटीसुद्धां चूक घडूं नये याबाबत मी अतिशय सावधगिरी घेत असें. मग बाकीच्या गुणांच्या बाबतींत मी तितकेंसें लक्ष देत नसें. फक्त त्यांच्या बाबतींतल्या चुका तेवढ्या मी दैनंदिनींत खुणा करून दर्शवीत असें. अशा रीतीनें पहिल्या आठवडयांत मिताहार या गुणाची रेषा जर मी निर्दोष ठेवूं शकलों तर मग मला तेवढ्या प्रमाणांत तो गुण आत्मसात् झाल्यासारखा वाटे. उलट जर त्या रेघेवर कांहीं खुणा आढळल्या तर त्या गुणाचे बाबतींत मानसिक दुर्बलता वाटे. अशाप्रकारें एक आठवडा एका गुणास देऊन मग मी दुसऱ्या गुणाकडे वळत असें. अशा क्रमानें जात असतां तेरा आठवडयांत सर्व गुणांची एक आवृत्ति व वर्षांतून चार वेळां अशा आवृत्त्या मला पुऱ्या करतां येत असत.

एखाद्या माळ्याला एखाद्या बागेंतील तण काढून तेथें बाग करावयाची असली म्हणजे तो कांहीं ती सबंध बाग एकदम खणायला व भांगलायला घेत नाहीं. कारण तें त्याच्या शक्तीच्या बाहेरचें व अशक्य होईल. तो त्याचे वाफे करतो व एकामागून एक वाफा घेऊन तो स्वच्छ करीत करीत ती सर्व बाग सुंदर प्रकारें लागवडीखालीं आणतो. तसें एका गुणाचे बाबतींत मला यश आलें म्हणजे मग दुसरा मी घेत असें. आणि मला वाटतें त्यामुळें

आणखी एक समाधान मला प्राप्त होत असे. तें म्हणजे आपली रोजच्या रोज प्रगति कशी होत आहे याचें प्रत्यक्ष दर्शन मला दैनंदिनीमुळें होई व त्यामुळें मला एक प्रकारचा उत्साह वाटे. अखेरी अखेरीस तर बहुतेक रेघा आठवड्यांतून बहुतेक दिवशीं कोऱ्याच राहूं लागल्या. अर्थात् त्यासाठीं अशा अनेक आवृत्त्या कराव्या लागल्या. पण शेवटीं आधीं सांगितल्याप्रमाणें जेव्हां जवळ जवळ सर्व पान कोरें राहूं लागलें तेव्हां तेरा आठवड्यांच्या दैनिक आत्मनिरीक्षणाचें समाधान झालें असें मला वाटे.

(पान २३ वर दैनंदिनींतील पानाचा नमुना पहा)

**परमेश्वराची प्रार्थना**

या माझ्या वहीवर ब्रीदवाक्य म्हणून ॲडिसनच्या 'कॅटो' (Cato) या काव्यांतील पुढील ओळी लिहिल्या होत्या :

"मला असें निश्चित वाटतें कीं मानवाहून श्रेष्ठ अशी जर एखादी दैवी शक्ति असेल--आणि तशी एक शक्ति असणार यांत शंका नाहीं; कारण सर्व सृष्टि आपल्या क्रिया-प्रतिक्रियांतून तिच्या अस्तित्वाची कठरवानें ग्वाही देत आहे--तर ती शक्ति सद्‌गुणांनीं आनंदित होईल. आणि जें तिला आनंदित करतें तें निश्चितपणें सुखकारकच असेल."

सिसेरोच्या ग्रंथांतीलहि पुढील मजकूर लिहिला होता:

"हे जीवन-मार्गदर्शक विचारशक्ते, तूं सद्‌गुण शोधून वाढवितेस व दुर्गुणांचा विनाश करतेस. तुझ्या मार्गदर्शनानुसार घालविलेला एक दिवस हा पापांनीं भरलेल्या चिरजीवितापेक्षां श्रेयस्कर आहे."

तसेंच शहाणपण किंवा सद्‌गुण यासंबंधींचें सॉलोमनचें पुढील वाक्य होतें :

## मिताहार

सुस्ती येईल इतकें खाऊं नये; शुद्धि जाईल इतकी दारू पिऊं नये.

| | र | सो | मं | बु | गु | शु | श. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मि | | | | | | | |
| मौ | L L | L | | L | | L | |
| शि | L | L | L | | L | L | L |
| दृ | | | L | | | L | |
| का | | L | | | L | | |
| दी | | | L | | | | |
| स | | | | | | | |
| न्या | | | | | | | |
| सं | | | | | | | |
| स्व | | | | | | | |
| शां | | | | | | | |
| प | | | | | | | |
| न | | | | | | | |

"त्या देवतेच्या उजव्या हातांत चिरजीवन आहे तर डाव्या हातांत संपत्ति व मानमान्यता आहे. तिचे मार्ग नेहमीं सुखदायक असतात व ती नेहमीं शांतीच्या मार्गानें जाते."

तसेंच परमेश्वर हाच सर्व बुद्धीचा व ज्ञानाचा उगम आहे असें मनांत वागवून सुरवातीस या कामामध्यें त्याच्या साहाय्याची याचना करणें मला अत्यावश्यक वाटलें. म्हणून मीं पुढील प्रार्थना माझ्या दैनंदिनींत लिहून ठेवली. ती मला दैनिक निरीक्षणापूर्वी वाचावयास मिळे :

"हे सर्वशक्तिमान् मंगलमय परमेश्वरा, तूं अतिशय उदार असा पिता आहेस. अतीव दयामय मार्गदर्शक आहेस. ज्यामुळें मला माझें खरें हित कळूं लागेल अशी बुद्धि मला दे. तसेंच त्या बुद्धीच्या आदेशाप्रमाणेंच वर्तन करण्याचें दृढनिश्चयी सामर्थ्य मला दे. तूं माझ्यावर जे अनंत उपकार सतत करीत असतोस त्यांची अल्पशी भरपाई म्हणून, हे परमेश्वरा, तुझ्या इतर पुत्रांची जी सेवा मीं केली आहे वा करत आहे ती तूं आपल्या चरणीं रुजू करून घ्यावीस."

कांहीं वेळां थॉम्सनच्या पद्यग्रंथांतील पुढील उताऱ्याचाहि प्रार्थनेसाठीं मी उपयोग करीत असें :

"हे प्रकाश व जीवन देणाऱ्या परमेश्वरा, तूं सर्व मांगल्याचें परमधाम आहेस. सौजन्य व चांगुलपणा कशांत आहे तें मला शिकव आणि मला तुझ्या स्वरूपाचें ज्ञान दे. मूर्खपणा, रिकामी ऐट आणि दुर्गुण यापासून मला वांचव. क्षुद्र आकांक्षेच्या वाऱ्यासमुद्धां मला उभा राहूं देऊं नको. माझ्या बुद्धींत ज्ञान, तद्युक्त शांति व शुद्ध शील

ओत. आणि पवित्र, अंतिम कल्याणकारक व अमर असा तुझा वरदहस्त माझे शिरावर असूं दे."

शिस्त किंवा व्यवस्था या गुणाच्या माझ्या व्याख्येंत असें एक कलम होतें कीं, माझ्या प्रत्येक छोटया मोठया कर्तव्याच्या वांटणीस त्याचा राखीव वेळ पाहिजे. म्हणून माझ्या दैनंदिनींतल्या एका पानावर मी पुढीलप्रमाणें दिवसाच्या चोवीस तासांचें वेळापत्रक लिहून ठेवलें होतें.

**वेळापत्रक** (वेळापत्रकाचा नमुना पान २६ वर पहा.)

हा सर्व कार्यक्रम मीं अमलांत आणला व दैनंदिन मी माझीच परीक्षा करूं लागलों. असेच कांहीं दिवस गेल्या-नंतर एक गोष्ट माझ्या चांगलीच नजरेस आली. आणि त्यामुळें मला एक धक्काच बसला. ती गोष्ट म्हणजे ही कीं मी स्वतः आपणांस जेवढा निर्दोष समजत होतों तेवढा तर नाहींच तर उलट अनेक दोषांचें आगर माझे ठिकाणीं होतें. परंतु मला एक समाधान मात्र नक्की मिळत असे आणि तें म्हणजे हें कीं हे माझे दोष दिवसानुदिवस क्रमाक्रमानें कमी होत चालले होते. ही माझी वही वरचेवर संपत असे व ती मला पुन्हा पुन्हा नवीन घालावी लागे. ही कटकट टळावी म्हणून मी एक युक्ति केली. हस्तीदंती पानांच्या एका स्मरणवहीवरती माझी तीं दैनंदिनींतली पानें आराखडयासह आंखून ठेवलीं. माझ्या त्या गुणांच्या व्याख्याहि त्यावर लिहून ठेवल्या. उभ्या आडव्या रेघा तांबडया शाईनें मारल्या. हेतु हा कीं त्या जास्त दिवस टिकाव्यात. त्यावर साध्या काळया शिसपेन्सिलीनें माझ्या अपराधांची नोंद मी करत असें. त्या खुणा नंतर

| | | |
|---|---|---|
| सकाळचा प्रश्न : आज मी कोणतें सत्कृत्य करीन ? | ५ | उठणें, शरीरस्वच्छता, सर्वशक्तिमान मंगलमय परमेश्वराचें ध्यान, दिवसाच्या उद्योगाचा तपशील निश्चित करणें, चालू अभ्यास करणें, न्याहरी. |
| | ६ | |
| | ७ | |
| | ८ | उद्योगधंद्याचें काम. |
| | ९ | |
| | १० | |
| | ११ | |
| मध्यान्ह | १२ | वाचन, हिशेबाचें अवलोकन, जेवण. |
| | १ | |
| दुपार | २ | उद्योगधंद्याचें काम. |
| | ३ | |
| | ४ | |
| | ५ | |
| सायंकाळचा प्रश्न : आज आपण सत्कृत्य काय केलें ? | ६ | सर्व वस्तु जागच्या जागीं (योग्य जागीं) ठेवणें, भोजन, संगीत, गप्पागोष्टी, करमणूक, दिवसाचें निरीक्षण. |
| | ७ | |
| | ८ | |
| | ९ | |
| रात्र | १० | झोप. |
| | ११ | |
| | १२ | |
| | १ | |
| | २ | |
| | ३ | |
| | ४ | |

मला साध्या ओल्या स्पंजानें पुसतां येत असत. यांत फायदा असा कीं जुन्या कागदी वह्यांवरच्या खुणा खोडावयाच्या म्हणजे अनेक वेळां कागद फाटे आणि वही बाद होई. तें आतां टळलें. पुढें पुढें कांहीं वर्षांनंतर मी ही माझी आवृत्ति वर्षांतून एकदांच करोत असें. त्यानंतर मी कांहीं वर्षांतून एकदांच करीत असें. पण पुढें पुढें जसजसे लांब-लांबचे प्रवास करावे लागले व द्वीपान्तरींचीं अतिशय गुंता-गुंतीचीं बहुविध स्वरूपाचीं कामें शिरावर घ्यावीं लागलीं तसतसें, या आवृत्या करणें मला सोडून द्यावें लागलें. परंतु तो लहानशी वही मात्र सदोदित मी जवळ बाळगत असें.

व्यवस्था किंवा शिस्त या गुणानें मात्र मला अतिशय त्रास दिला. आणि माझ्या अनुभवाचा मीं असा निष्कर्ष काढला आहे कीं ज्या माणसाला आपला वेळ आपण कसा घालवावा याचें पूर्ण स्वातंत्र्य आहे. तसें स्वातंत्र्य ज्याच्या व्यवसायांत मिळूं शकतें. असा एखादा मनुष्य सोडला, तर सामान्यपणें जो एखाद्या धंद्यांत मालक म्हणून वावरतो व तन्निमित्तानें ज्याचा सर्व जगाशीं हरघडी संबंध येतो. नाना प्रकारच्या लोकांच्या भेटी गांठी त्यांच्या त्यांच्या सवडीप्रमाणें ज्याला घ्याव्या लागतात. अशा कोणाही व्यक्तीला व्यवस्था हा गुण काटेकोरपणें अमलांत आणणें कठिण आहे, जवळ जवळ अशक्यप्राय आहे. वेळेच्या बाबतींतच नव्हे, तर सर्व वस्तु त्यांच्या त्यांच्या योग्य जागीं ठेवणें हा गुण सुद्धां आत्मसात् करणें मला अतिशयच कठिण गेलें. कोणतेंहि काम कांहीं एका नियोजित पद्धतीनें करण्याची मला कधींच संवय नव्हती.

आणि त्यांत पुन्हा स्मरणशक्ति चांगलीच तल्लख असल्यानें योग्य पद्धतीच्या व नियोजनाच्या अभावीं आपली किती गैरसोय व नुकसान होत आहे इकडे माझें लक्षहि जात नसे. या एका गुणाचे बाबतींत मला सततची काळजी वाटे व त्रास होई. त्यांतील अपराधांची अगणितता पाहून मी अति गोंधळून व शरमून जाई. त्यांत सुधारणा मुंगीच्या पावलानें होणेंसुद्धां किती कठिण जाई व पुन्हा पुन्हा त्यांत इतक्या चुका होत कीं शेवटीं एक वेळ मला असें वाटलें कीं सोडून द्यावा हा सगळा उद्योग ! आणि तो गुण आपल्या अंगांत नसला तर तेवढा उणेपणा आपल्याकडे राहणारच, तो कांहीं जाणार नाहीं, व्यर्थ त्याचे पाठीस लागूं नये, असा एकतऱ्हेचा अगतिकतेचा विचारच मनाला समाधान देऊं लागला.

### मळकट कुऱ्हाडीची गोष्ट

या संदर्भांत मला एक गोष्ट आठवते—आमच्या शेजारच्या लोहाराकडे एक मनुष्य एक कुऱ्हाड विकत घ्यावयास आला होता. त्यानें सर्व कुऱ्हाड पाहिली व तो म्हणाला, 'लोहारदादा, या कुऱ्हाडीचा सर्व भाग या धारेसारखाच चकचकीत करून देशील का ?' लोहार म्हणाला, 'देईन; पण माझी एक अट आहे.' त्या गृहस्थानें विचारलें, 'ती कोणती ?' लोहारानें सांगितलें, 'हें माझें चाक तूं फिरवलें पाहिजेस.' त्या माणसानें तें कबूल केलें आणि तो चाक फिरवूं लागला. पण चांगली चकाकी यावी म्हणून लोहार जसजशी ती कुऱ्हाड जोरानें त्या चाकावर

दाबून धरी तसतसें तें चाक जड यायला लागलें. तो मनुष्य वारंवार जागेवरून उठे, पुन्हा पुन्हा चाकाजवळ जाई व कुऱ्हाडीला चकाकी किती झाली तें पाही. लोहार म्हणे, 'हं फिरव तें चाक. मी इथें चांगली दाबून धरली आहे ही कुऱ्हाड.' होतां होतां बापड्याचे हात अगदीं दुखून गेले. तेव्हां तो विचारतो, 'लोहारदादा, अजून किती वेळ लागेल रे ?' लोहार म्हणतो, 'अरे एवढ्यांत किती वेळ म्हणून काय विचारतोस ? अजून तिच्यावरचे हे मळकट डाग सुद्धां गेले नाहींत.' शेवटीं तो मनुष्य म्हणाला, 'मला वाटतें कीं ही मळकटलेली कुऱ्हाडसुद्धां चालेल मला. तशी कांहीं वाईट नाहीं ती. लोखंडाचीच आहे ती. तेव्हां तशी काळी असायचीच.' आणि मला वाटतें कीं माझ्या-प्रमाणें कांहीं विशेष योजना न केल्यामळें जुन्या वाईट संवयी सोडण्याच्या व नवीन चांगल्या संवयी बाणविण्याच्या प्रयत्नांत अपयश आलेल्या सर्वांनी हेच उद्‌गार काढले असावेत– "असेना मळकट चालेल ती सुद्धां कुऱ्हाड !"

बुद्धि म्हणून स्वतःला भासवणारी कोणीतरी एक मला नेहमीं सांगत असे कीं 'अरे, या गुणांच्या ज्या सर्वश्रेष्ठ पातळीची वा दर्जाची अपेक्षा स्वतःबाबत तूं करतो आहेस ती पातळी, तो दर्जा म्हणजे नीतिकल्पनांमधलें एक मोठें थोतांड आहे, बुवाबाजी आहे. जर तुझें मत लोकांना समजलें तर लोक केव्हांच तुझी हुर्रेवडी उडवतील. तुला हें माहीत आहे का ? एखाद्याचें शील जर सर्वोत्कृष्ट व परिपूर्ण बनलें तर लोक त्याचा हेवा आणि द्वेष करूं लागतील आणि त्याची परिपूर्णता हीच त्याची सर्वांत मोठी

अडचण होईल. तेव्हां प्रत्येक परोपकारी सज्जन मनुष्यानें आपल्याजवळच्या कांहीं दोषांकडे दुर्लक्ष करावें. त्यांना खुशाल जवळ असूं द्यावें. म्हणजे चार माणसें, मित्रमंडळी आपल्याजवळ यावयास कचरत नाहींत.' थोडक्यांत वस्तुस्थिति सांगायची म्हटली म्हणजे शिस्त किंवा व्यवस्था या गुणाशीं आपलें कांहीं पटलें नाहीं. आणि आतां म्हातारपणीं तर मला असें वाटायला लागलें आहे कीं तो गुण आपल्याजवळ मुळींच नाहीं. तथापि एकंदरींत विचार करतां मला असें वाटतें कीं जेवढ्या प्रमाणांत तो गुण अंगांत बाणविण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती तेवढ्या प्रमाणांत जरी नसला व मी जरी बराच कमी पडलों असलों तरी या प्रयत्नामुळें मी अधिक सुधारलों व अधिक सुखी झालों, यांत शंका नाहीं. हा प्रयत्न अजिबात न करतां हें झालें नसतें असें मला वाटतें. कित्त्यांतील अक्षराकडे पाहून जे आपलें अक्षर गिरवितात व पुस्ती काढतात, त्यांचें अक्षर कित्त्याइतकें जरी चांगलें झालें नाहीं तरी कांहीं एक प्रमाणांत तें सुधारतें व पुढें पुढें प्रसन्न व सुवाच्य बनतें हा आपला अनुभव आहेच ना ?

**सद्गुणसंपत्ति हेंच साधन**

माझ्या मागून येणारांनीं हें सुद्धां ध्यानांत ठेवावें कीं स्वत:मध्यें सुधारणा करण्याचा हा जो मार्ग मी आंखला तो वयाच्या एकोणऐंशी वर्षांपर्यंत, म्हणजे ज्यावेळीं आता मी हा मजकूर लिहीत आहें त्या वेळेपर्यंत, तितक्याच निष्ठेनें परमेश्वरकृपेनें मी आचरीत आहें. आतां पुढील

भविष्यकाळांत कांहीं आपत्ति आल्या तर सर्वेश्वराची मर्जी होय. पण मागील उपभोगलेल्या सुखांचा विचार मनांत येऊन त्या आपत्तीकडेसुद्धां जरा आदरभावानेंच मी बघेन. मिताहारामुळेंच माझें आरोग्य प्रदीर्घ कालपर्यंत टिकलें व आज सुद्धां वयोमानानुरूप जी सुदृढ शरीरयष्टि मजजवळ आहे ती त्याचेंच फळ आहे. माझी आर्थिक परिस्थिति लवकर सावरली गेली, पुढें पैसाहि मिळाला, समाजांतील एक उपयुक्त नागरिक बनून कांहीं विद्वान पंडितांमध्यें मानमान्यता मिळण्याइतकें ज्ञान मला मिळालें. हें सर्व जर कशाचें फळ असेल तर तें म्हणजे दीर्घोद्योग व काटकसर यांचें होय. आपल्या देशांतील सर्व जनतेचा विश्वास मी संपादन केला आणि मोठमोठ्या सन्मानाचीं व जबाबदारीचीं कामें देशानें मजवर सोंपविलीं हें मला वाटतें, माझा सच्चेपणा व न्यायप्रियता याचें फळ असावें. आणि अपुऱ्या अर्धवट स्थितींतील कां होईना, पण या सर्व गुणांच्या समुच्चयाचें फळ म्हणजे हें कीं त्यामुळें मजजवळ स्वभावांतील सौम्यता व संभाषणांत प्रसन्नता आहे. आणि त्यामुळें अजून एवढ्या वृद्धपणीं सुद्धां, लोकांना माझा सहवास हवासा वाटतो व तरुण मंडळीशीं सुद्धां माझें जमतें.

शेवटीं, या सर्व निमित्तानें मला सांगावयाचें तें इतकेंच कीं, दुर्गुण किंवा दुष्कृति या निषिद्ध आहेत म्हणून दोषार्ह आहेत असे नव्हे; तर त्या दोषार्ह आहेत आणि म्हणून निषिद्ध आहेत. आणि म्हणून ज्याला ज्याला म्हणून सुखप्राप्तीची इच्छा असेल त्यानें त्यानें सद्‌गुणसंपन्न बनावें हें

त्याच्या हिताचेंच आहे. अणि जगामध्यें मोठमोठे व्यापारी, राज्यकर्ते किंवा अशासारखे दुसरे लोक नेहमींच असणार कीं ज्यांना आपल्या उद्योगाच्या व्यवस्थेसाठीं नेहमींच मोठ्या प्रामाणिक, कार्यक्षम व सद्गुणी माणसांची आवश्यकता असते. आणि अशीं माणसें तर फार थोडीं असतात. म्हणून माझ्या तरुण मित्रांची मी खातरजमा करूं शकतों कीं अगदीं गरिबांतल्या गरीब माणसाला सुद्धां जर श्रीमंती मिळवावयाची असेल तर निष्कलंक, सच्चरित सद्गुसंपत्ति याशिवाय अन्य कोणतेंहि खात्रीचें साधन नाहीं.

* * *

...नालय शाखा.
१२५० दि० २०।५।७
वा.वा.
BVBK-0401250
BVBK-0401250

# काहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'काहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा व्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : फ. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्गुणी बनण्याची कला : फ्रँकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमॉ
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटू : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.